# वार अडकणे : कारणे व उपाय

**डॉ. महेशकुमार इंगवले**

पशुजनन, मादीरोग व प्रसुतीशास्त्र विभाग
स्नातकोत्तर पशुवैद्यक व पशु विज्ञान संस्था, अकोला.

गाय व्याल्यानंतर साधारणपणे १० ते १२ तासात वार गर्भाशयातून बाहेर पडतो. वार बारातासापर्यंत पडला नाहीतर त्याला वार अडकणे असे म्हणतात.

साधारण खालील कारणामुळे वार बाहेर पडत नाही.

**कारणे :**

१. प्रसुतीनंतर जनावरामध्ये कळाचा अभाव.

२. गर्भपात व कष्ट प्रसुती.

३. व्यायामाचा अभाव व अशक्तपणा.

४. कॅल्शीयम व फॉस्फरस या क्षाराची कमतरता.

५. गर्भपात होणाऱ्या संसर्गजन्य रोगाचा प्रादुर्भाव.

**लक्षणे :**

१. योनीमार्गात वाराचा काही भाग लटकलेला दिसतो अथवा दिसत नाही. तसेच लघवी करतांना घाण वास येतो.

२. गाईच्या ओटी-पोटीत वेदना होत असल्याने गाय सारखे माघे वळून बघते.

३. गाय बैचेन राहते व कळा मारते.

४. खाद्य खाण्याकडे लक्ष राहत नाही व शरीराचे तापमान वाढते.

५. गाय पान्हा लवकर सोडत नाही तसेच दुध कमी देते.

**उपाय :**

१. गाभण काळात गाईस पुरेसा व्यायाम द्यावा.

२. गाभण काळात गाईस संतुलीत आहार व क्षार मिश्रण द्यावे. त्यामुळे अशक्तपणा येणार नाही.

३. घरगुती उपाय म्हणजे वाराला चप्पल, झाडू बांधु नये. जड वस्तु बांधल्यामुळे गर्भाशय बाहेर येण्याची शक्यता निर्माण होते.

४. वार ओढुन बाहेर काढु नये, यामुळे गर्भाशयाला इजा होते व प्रजननक्षमता कमी होते.

५. वार अडकल्यास पशुपालकांनी १ किलो गुळ, १ लिटर पाण्यात मिसळुन गुळाचे पाणी गाईस पाजावे. गाय व्याल्यानंतर १० ते १२ तासानंतर वार न पडल्यास पशुवैद्यकांकडुन उपचार करुन घ्यावे.



**गर्भाशयात अडकलेला वार**